दिनांक १३/०१/२०२१

**वार्तापत्र**

## खुनाचे गुन्हयातील आरोपीस पुणे येथून शिताफिने अटक
## गुन्हे शाखा, कक्ष ३ ची कामगीरी

| | | |
|---|---|---|
| १ | कक्ष | गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुअवि, कक्ष ३, मुंबई |
| २ | पोलीस ठाणे | वरळी पोलीस ठाणे, मुंबई |
| ३ | गु.र.क्र. व कलम | गु.र.क्र. ४१८/२०२० कलम ३०२ भा.दं.वि |
| ४ | दाखल दिनांक | दि. २४/१२/२०२० रोजी १७.०० वा. |
| ५ | गुन्हा घडला दिनांक, वेळ | दि.२३/१२/२०२० वेळ २३.२० वा.च्या पुर्वी |
| ६ | घटनास्थळ | माया नगर बिल्डींग नं ०३ जवळ, लेबर कॅम्प, बी.जी.खेर मार्ग, वरळी, मुंबई |
| ७ | फिर्यादीचे नाव | प्रशांत नारायण पाटील वय -४१ वर्ष पोउनि, वरळी पोलिस ठाणे मुंबई |
| ८ | आरोपींची संख्या | ०१ |

दिनांक २४/१२/२०२० रोजी वरळी पोलीस ठाणेच्या हददीमध्ये माया नगर, बिल्डींग नं ०३ जवळ, लेबर कॅम्प, बी.जी.खेर मार्ग, वरळी, मुंबई एका खोलीत महिला नामे शिखा नारायण मंडल उर्फ शिखा बिमल टिकादार मंडल वय ४४ वर्ष हिचा अज्ञात कारणावरुन आरोपी नामे शिबु भौमिक याने गळा आवळुन तसेच कपाळावर व नाकावर बोथट हात्याराने मारुन जखमी करुन जीवे ठार मारले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने व आरोपी गुन्हा करुन पळुन गेल्याने त्याचा शोध घेण्याकरीता गुन्हे शाखा, कक्ष ३ चे पथक नेमण्यात आले होते. आरोपी हा मुळचा राहणारा पश्चिम बंगालचा होता.

सदर आरोपी हा बंगाली असून तो त्याचे राहते गांव पश्चिम बंगाल येथे जाण्याची शक्यता लक्षात घेवून मुंबईतून पश्चिम बंगाल येथे जाणाऱ्या रेल्वे गाडयांवर या कक्षाचे अधिकारी व पथकामार्फत पाळत ठेवण्यात आली होती. गुन्हयाचे घटनास्थळ व आजुबाजूचे परिसरातील सर्व सीसीटिव्ही फुटेजची तपासणी करण्यात आली. परंतु आरोपीचा सुगावा लागेल अशी कोणतीही माहीती प्राप्त होत नव्हती. मानवी कौशल्याच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना सदरचा आरोपी कर्नाटक व महाराष्ट्र राज्यामध्ये वेगवेगवळया ठिकाणी अस्तित्व लपवून राहत असल्याची माहीती मिळाली. सदर माहीतीच्या अनुषंगाने सतत पाठपुरावा करुन दिनांक १२/०१/२०२१ रोजी तपास पथकाने आरोपीस पुणे येथून शिताफीने अटक केली. चौकशीमध्ये कौटूंबिक वादातून आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. अशा प्रकारे सदरचा गंभीर गुन्हा उघडकिस आणण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस सह आयुक्त(गुन्हे) श्री.मिलींद भारंबे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. वीरेश प्रभु, पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) श्री.प्रकाश जाधव, सहाय्यक पो.आयुक्त, प्रकटीकरण-मध्य श्री.अविनाश शिंगटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष ३ चे प्रभारी पोलीस निरीक्षक अशोक खोत, सपोनि गजानन भारती, **पोउनि मोहसिन पठाण, पोना आकाश मांगले, पोशि भास्कर गायकवाड, पोशि वैभव बिडवे,** पोशि राहुल अनभुले, पोना शिवाजी जाधव, पोशि मंगेश शिंदे, पोशि राहुल पाटील, पोशि ईश्वर विंचु यांनी केली आहे.

------